# ॥ अध्याय पांचवा ॥

## ॥ श्रीगुरुदेव दत्त–स्वामीसमर्थ ॥

॥ श्रीगणेश-सरस्वत्यैनमः ॥ श्रीमद्दत्तात्रेयदिगंबरायनमः ॥ शिष्य प्रार्थितसे गुरुवक्त्याप्रति । अवतारचरित्राध्यायाचे अंतीं । जयंत्याध्याय सांगूं निश्चितीं । ऐसें आपण वचन दिलें ॥ १ ॥ त्या आपल्या वचनानुसार । जयंत्याध्याय सांगा सविस्तर । शिष्याचें वचन ऐकिल्यानंतर । गुरु सप्रमाण सांगती ॥ २ ॥ जयंत्युत्साहीं श्रीभगवंताचें । पूजन उपवासादि करितां साचें । दुरितनाशन अनेक जन्मांचें । वांछित फल प्राप्त होतें ॥ ३ ॥ चैत्रशुक्ल प्रतिपदा दिनीं । संवत्सरारंभीं सूर्योदयव्यापिनी । असेल जी तीच जनीं । आदरावी अवश्य ॥ ४ ॥ ब्रह्मपुराणांतील वचन । चैत्रमासीं शुक्लप्रतिपदादिन । ते दिनीं सूर्योदयीं हें जग उत्पन्न । केलें प्रथम ब्रह्मदेवानें ॥ ५ ॥ जेव्हां दोन्हीही दिवशीं । प्रतिपदा असेल सूर्योदयकालासी । अथवा नसेल उदयासी । तेव्हां पहिलीच आदरावी ॥ ६ ॥ वृद्ध वसिष्ठाचें वचन । कीं चैत्र शुक्ल प्रतिपदा दिन । कृष्णप्रतिपदा फाल्गुन । आणि कार्तिक शुद्ध प्रतिपदा ॥ ७ ॥ ह्या पूर्वतिथिनियुक्त असतील । आदराव्या त्याचि प्रांजल । संवत्सरप्रतिपदेसी पाणपोई चिरकाल । घालून उदक द्यावें जनासी ॥ ८ ॥ इतुक्या दिवशीं तैलाभ्यंगस्नान । न केलिया दोष होती उत्पन्न । नरकप्राप्ति सांगितली म्हणून । तैलाभ्यंग अवश्य करावें ॥ ९ ॥ प्रतिपदेसि घरोघरीं ध्वजारोपण । भक्तीनें देवब्राह्मणपूजन । निंबपत्रादिकभक्षण । विप्रसंतर्पण करावें ॥ १० ॥ पारिभद्राचें पुष्प पत्र कोमल । मरीच लवण हिंगु जीरक अजमोद हीं सकल । एकत्र करूनि भक्षावीं मंगल । आरोग्यार्थ सर्वांनीं ॥ ११ ॥ उत्तम भोजन पंचांग-श्रवण । करावें द्यावें दक्षिणादान । उत्साह भगवत्कीर्तन स्मरण । सत्य मृदु

भाषण करावें ॥ १२ ॥ आरंभ देवीनवरात्रासी । कींजे या संवत्सरप्रतिपदेसी । ही प्रतिपदा द्वितीयायुक्त ऐशी । घ्यावी अमावास्या वर्जुनी ॥ १३ ॥ द्वितीयायुक्त मुहूर्तमात्र जरी । असेल तरी ती घ्यावी देवीनवरात्रीं । शारदा-नवरात्रासम चतुरीं । पारणादि निर्णय जाणावा ॥ १४ ॥ संवत्सरप्रतिपदेसि 'मत्स्यजयंती' । अपराण्हीं कोणी तृतीया पंचमी म्हणती । आषाढशुक्ल एकादशी सांगती । कल्पभेदें कित्येक ॥ १५ ॥ नूतन वर्षाचें नामोच्चारणादिक । संकल्पादिक करणें तें आवश्यक । चैत्रशुद्ध प्रतिपदेसी असतां अधिक । परी मलमासांतचि करावें ॥ १६ ॥ परंतु अधिक चैत्रमासीं देवकार्य । करण्यास असे निषेध प्रत्यवाय । म्हणूनि देवकार्य न होय । अधिक-चैत्रमासांत कदापि ॥ १७ ॥ तात्पर्य अधिक-चैत्रमासांत । शुभ देवकार्यें न करावीं हें विहित । केवळ द्वितीय चैत्रमासांत । शुद्ध प्रतिपदेस करावीं ॥ १८ ॥ अधिक-चैत्रांत निंबपत्रभक्षण । करूं नये संवत्सर-फलश्रवण । केवल शुद्ध चैत्रप्रतिपदेसीच जाण । करावें तें मंगलप्रद ॥ १९ ॥ चैत्र शुद्ध तृतीया तिथीला । कर्कलग्नीं शुभवेळेला । 'गौरीदेवीचा जन्म' जाहला । चतुर्थीयुक्त घ्यावी ही ॥ २० ॥ घेऊं नये द्वितीयायुक्त । तृतीया करावी चतुर्थीसहित । या तृतीयेपासून एक मासपर्यंत । 'उमामहेश्वरपूजन' करावें ॥ २१ ॥ चतुर्थीयुक्त जी गौरीतृतीया । ती पुत्रपौत्रादि संतति सौभाग्या । देणारी म्हणून चतुर्थीयुक्त तृतीया । घ्यावी गौरी-आंदोलन-व्रतासी ॥ २२ ॥ चतुर्थीयुक्त तृतीयेसी जरी । वैधृत्यादि कुयोग असती तरी । स्वीकारावी तीच खरी । घेऊं नये द्वितीयायुक्त ॥ २३ ॥ अखंडसौभाग्यकारक । 'गौरीव्रत' हें पुत्रपौत्रप्रदायक । शिवगौरीपूजन सम्यक । अवैधव्यकर स्त्रियांसी ॥ २४ ॥ चैत्र शुद्ध पंचमीदिनीं । 'मीनावतार' म्हणती झाला मध्यान्हीं । चैत्र शुद्ध अष्टमीदिनीं । 'भवानी-जयंती' असे हो ॥ २५ ॥ चैत्र शुद्ध अष्टमीला । 'अन्नपूर्णेचा जन्म' झाला । चैत्रशुद्ध नवमी तिथीला । जन्म जाहला 'तारेचा' ॥ २६ ॥ चैत्रमासीं शुद्ध नवमी दिनीं । भृगुवासरीं प्रदोषव्यापिनी । अकस्मात् मणिद्वीपनिवासिनी । 'भुवनेश्वरी'

उद्भवली ॥ २७ ॥ चैत्र शुक्ल नवमी दिनीं । पुनर्वसु-नक्षत्रीं मध्यान्हीं । 'श्रीराम' जन्मले कर्कलग्नीं । ती रामजयंती प्रसिद्ध ॥ २८ ॥ ही रामनवमी मध्यान्हव्यापिनी । महत्पुण्यतमा वर्णिली पुराणीं । म्हणूनि हीच स्वीकारिजे जनीं । सर्व संशय निरसुनी ॥ २९ ॥ दोन्ही दिवशीं मध्यान्हव्यापिनी । असतां अथवा नसतां जनीं । द्वितीय दिवसाची स्वीकारुनी । अष्टमीविद्ध त्यजावी ॥ ३० ॥ पूर्वदिवशीं पूर्ण मध्यान्हकालीं । जरी ही नवमी असली । आणि द्वितीयदिनीं तैशीच आली । मध्यान्हींच्या एकभागीं ॥ ३१ ॥ तरीही जी पूर्वअष्टमीयुक्त । ती नवमी टाकावी शास्त्रनिषेधित । द्वितीय दिनींचीच घ्यावी विहित । माधवादि मतानें ॥ ३२ ॥ मध्यान्हकालीं अष्टमीयुक्त । नवमी असली पुनर्वसु-नक्षत्रसहित । तथापि त्यागूनि ती वेधित । घ्यावी द्वितीय दिवसाची ॥ ३३ ॥ जेव्हां असेल दशमी क्षयासी । आणि नवमीच्या पारणादिवशीं । येईल स्मार्ताची एकादशी । तेव्हां अष्टमीयुक्त तई घेइजे ॥ ३४ ॥ दुसरे दिवशीं सहा घटिकापर्यंत । असलेली नवमी वैष्णवांसी उक्त । आणि शुद्ध नवमी नसेल मिळत । किंवा तीन मुहूर्त असेल ॥ ३५ ॥ अथवा तीन मुहूर्तांहून कमी । असतां अष्टमीविद्ध नवमी । तद्दिनीं सर्वांनीं 'रामनवमी' । जयंती उपोषण करावें ॥ ३६ ॥ पुनर्वसु नक्षत्र दोन्ही दिवशीं । व्याप्त असेल नवमी मध्यान्हेसी । पुण्यकारक योग निश्चयेंसी । किंचित् भाग असतांही ॥ ३७ ॥ यदर्थीं असे अगस्तीचें वचन । तैसें पुरुषार्थचिंतामणीचें भाषण । दोन्ही दिवशीं पुनर्वसु जाण । माध्यान्हीं असतां नसतांही ॥ ३८ ॥ दोन्ही दिवशीं मध्यान्हसमयाला । पुनर्वसूचा संयोग असला । अथवा दोन्ही दिवशीं नसला । तथापि दुसरीच घ्यावी ॥ ३९ ॥ मध्यान्हीं नवमी पुनर्वसुयुक्त । असेल ती अवश्य स्वीकृत । किंवा ज्यापरी सांप्रदाय मत । त्यापरी करिती जयंतीतें ॥ ४० ॥ परंतु अधिक-मलमासांत । रामजन्मोत्साह मुळीं ना उक्त । द्वितीयचैत्रशुक्लीं करिजेत । अगस्तिसंहितेंत वचन असे ॥ ४१ ॥ चैत्र शुक्ल नवमीस उपोषण जागरण ।

पित्रोद्देशें करावें तर्पण । ब्रह्मप्राप्तीची ज्यांसी इच्छा जाण । त्यांनीं अगत्य करावें ॥ ४२ ॥ न केलिया रामजयंती-उपवास । कुंभिपाक नरकांत होय वास । म्हणूनि सर्वत्रांनीं जयंती-उपवास । भक्तिपूर्वक करावा ॥ ४३ ॥ श्रीरामपूजा प्रतिमादान । वेदघोष पुराणकीर्तन । दशमीस पारणा ब्राह्मणभोजन । करितां महत्पुण्य होतसे ॥ ४४ ॥ चैत्रशुक्लनवमी-मध्यान्हीं । मेषार्के पुनर्वसु-नक्षत्रीं कर्कलग्नीं । पंचग्रह असतां बलवान उच्चस्थानीं । श्रीराम अवतीर्ण जाहले ॥ ४५ ॥ साधूंचें व्हावया संरक्षण । दशाननादि दानवांचें विनाशन । करावया धर्मसंस्थापन । 'श्रीरामचंद्र' अवतरले ॥ ४६ ॥ या नवमीस देवीनवरात्रसमाप्ति । शारदीनवरात्रवत् करिती । चैत्रशुक्ल चतुर्दशीस सांगती । 'सिद्धेश्वरीचा जन्म' असे ॥ ४७ ॥ चैत्री शुक्ल पौर्णिमा सूर्योदयव्यापिनी । 'हनुमज्जयंती' घ्यावी जनीं । याचें कारण श्रोतृजनीं । सादरचित्तें परिसावें ॥ ४८ ॥ आपल्या जन्मकालींच हनुमंतें । फलबुद्धीनें सूर्यबिंब ग्रासावयातें । उड्डाण केलें ऐशी कथा आहे ते । म्हणून सूर्योदयीं जन्म ग्राह्य ॥ ४९ ॥ या चैत्रशुद्ध पौर्णिमेपासून । आरंभावें वैशाखस्नान । कोणी चैत्रशुद्ध एकादशीपासून । या स्नाना प्रारंभिती ॥ ५० ॥ अथवा मेषसंक्रातीपासून । कोणी करिती हें स्नान । व्रतासि राकापौर्णिमादिन । घेती जन सगळे ते ॥ ५१ ॥ शनि-रवि-गुरुवारयुक्ता । चैत्री पौर्णिमा आली असतां । तद्दिनीं स्नान श्राद्धादि कर्मे करितां । अश्वमेधफल लागतें ॥ ५२ ॥ चैत्रशुद्ध पौर्णिमेला । कित्येकीं सिद्धेश्वरी-जन्म कथिला । श्रीकाशीचा जन्मदिवस गणिला । इंद्रपूजनादि अन्वाधान करावें ॥ ५३ ॥ कोणी म्हणती चैत्रकृष्णनवमीस । श्रीहरीनें अपराण्हसमयास । धरिलें 'वराहावतारा'स । जगदुद्धार करावया ॥ ५४ ॥ तृतीया तिथीस वैशाख शुक्लांत । पुनर्वसु नक्षत्र-युक्त । निशीमाजीं प्रथम प्रहरांत । 'परशुरामजयंती' असे कीं ॥ ५५ ॥ रेणुकेच्या गर्भापासून । भार्गवराम झाले अवतीर्ण । एकवीस वेळ क्षत्रियशून्य । पृथ्वी केली विप्रेंद्रें ॥ ५६ ॥ दोन्ही दिवशीं प्रदोषकालीं । तृतीया जर व्यापक

असली । तरी दुसरे दिवसाची घेतली । पाहिजे जयंतीकारणें ॥ ५७ ॥ कारण संकल्पकालापासून । तृतीया असे व्यापून । दिवस-रजनीं तृतीयेचा योग म्हणून । दुसरी ग्रहण करावी ॥ ५८ ॥ प्रसंगवशात् ही अक्षय्य तृतीया । साङ्ग पूर्वाण्हव्यापिनी ग्राह्या । अर्ध मुहूर्त घेती शुभ कार्या । देवपित्रादि कर्मांसी ॥ ५९ ॥ वैशाखशुक्ल तृतीयादिनीं । यत्किंचित दानादिक भावेंकरुनी । करावें तें सर्वक्षयरहित होतें म्हणुनी । अक्षय्य तृतीया हिला म्हणती ॥ ६० ॥ वेदघोष कीर्तन पुराण । दुसरे दिवशीं ब्राह्मणभोजन । पारणें करुनियां जाण । साजरा दिन करावा ॥ ६१ ॥ सूर्योदयापासून दोन यामपर्यंत । पूर्वाण्हव्यापिनी तृतीया उक्त । दोन्ही दिवशीं पूर्वाण्हकालीं असतां व्याप्त । द्वितीया दिनीचीच घ्यावी ॥ ६२ ॥ ही तृतीया बुध किंवा सोमवारयुक्त । उत्तम परी असावी द्वितीयाविवर्जित । बुध रोहिणीयुक्त जरी द्वितीया असत । घेऊं नये तथापि ॥ ६३ ॥ रोहिणी नक्षत्र बुधवारयुक्ता । अति पुण्यदायक तृतीया ही तत्त्वतां ॥ उदकुंभदानें ब्रह्मलोकता । प्राप्त होय-अनायासें ॥ ६४ ॥ रत्नमालादि ग्रंथांचें वचन । अक्षय्यतृतीया 'कृतयुगारंभ' दिन । कार्तिकशुद्ध नवमीसी जाण । 'त्रेतायुगारंभ' असे ॥ ६५ ॥ द्वितीया करुनि विवार्जित । द्वितीयदिनीं चतुर्थीयुक्त । तृतीया असेल जी तीन मुहूर्त । तीच घ्यावी देवपितृकर्मांसी ॥ ६६ ॥ या चारीयुगारंभतिथींत । श्राद्धें करावीं पिंडरहित । पितृत्रय मातामहत्रय सपत्निक असत । त्यांचे उद्देशें करावें ॥ ६७ ॥ 'द्वापारयुगा' चा आरंभदिवस । भाद्रपदकृष्ण त्रयोदशीस । 'कलियुगाचा' प्रारंभदिवस । माघशुद्ध पौर्णिमा असे ॥ ६८ ॥ स्वोच्चस्थानीं षट्ग्रह बलवंत । मिथुनेसी राहुसंस्थित । 'परशुरामावतार' विख्यात । जयंत्युत्साह करावा ॥ ६९ ॥ कारण युगादि मन्वादि तिथींस । श्राद्धें केलिया तीं पितरांस । दोनसहस्र वर्षेपर्यंत तृप्तीस । देणारीं निश्चयें होताति ॥ ७० ॥ शुक्लपक्षाच्या युगादि तिथि । अथवा मन्वादि दिवस जे असती । त्या तिथींत श्राद्ध करावें शास्त्ररीतीं । पूर्वाण्हकालीं अवश्य ॥ ७१ ॥ आणि कृष्णपक्षांतील युगादि ।

ज्या तिथि अथवा मन्वादि । त्या दिवशीं श्राद्ध सांगितल्या विधीं । अपराण्हकालीं करावें ।। ७२ ।। जे असती धनादि रहित । त्यांसी श्राद्ध करणें अनुकूल नसत । म्हणून त्यांनीं मन्वादि युगादि तिथींत । तिलतर्पण तरी करावें ।। ७३ ।। भागीरथीच्या ओघानें पूर्वकालीं । जन्हूची तपश्चर्या भंग झाली । मग जन्हु क्रोधयुक्त होऊनि तत्कालीं । भागीरथीसी प्राशित ।। ७४ ।। स्वकन्येस जन्हुपिता । क्रोधावेशें झाला प्राशिता । हें देखूनि भगीरथें त्वरितां । आर्जविलें तयास ।। ७५ ।। तेव्हां जन्हूनें प्रसन्न होऊन । आपल्या दक्षिण कर्णरंध्रांतून । पुन्हां तियेस दिधलें सोडून । म्हणून 'जान्हवी' नाम पडियलें ।। ७६ ।। त्या गंगेचा उत्साह-जन्मदिवस । आहे वैशाख शुक्ल सप्तमीस । मध्यान्हकाल-व्यापिनी जन्मास । घ्यावी शुद्ध सप्तमी ।। ७७ ।। गगन-मेखला जियेचें कटिभूषण । मध्यान्हीं शुक्ल सप्तमीस भावेंकरून । या गंगादेवीचें केलिया पूजन । वांछितार्थ लाधतसे ।। ७८ ।। वैशाख शुक्ल चतुर्दशी । 'नृसिंहजयंती' म्हणती जियेसी । ती प्रदोषकालव्यापिनी जन्मासी । घ्यावी श्रीमन्नृसिंहाच्या ।। ७९ ।। स्वातिनक्षत्र सोम आणि शनिवार । सिद्धि-योग वणिज-कर्ण सुखकर । यांतील एकादा असतां योग सुंदर । किंवा हे सर्वही प्रशस्त जाणावे ।। ८० ।। श्रीमन्नृसिंहकृपाप्रसादेंकरून । सर्व सौभाग्य होतें अखंडवर्धन । ऐसें दुर्लभव्रत महद्भाग्येंकरून । पुरुषांसि प्राप्त होतसे ।। ८१ ।। ऐसें प्रतिवर्षीं हें श्रीमन्नृसिंहव्रत । भगवत्प्रसन्नतार्थ आचरावें संतत । पूजन उपोषण जागरण विप्रभोजनयुक्त । अनंत फलदायक असे हें ।। ८२ ।। 'कूर्म-बौद्ध-नृसिंह-कल्की' हे चार । सायंकालीं उद्भवले अवतार । ऐसा पुराणीं वाक्यसमुच्चयांत प्रकार । कथिला असे महर्षींनीं ।। ८३ ।। असो दोन्ही दिवशीं सूर्यास्तकालीं । चतुर्दशीची व्याप्ती असली । अथवा मुळींच नसली । तथापि द्वितीयादिनींचीच घ्यावी ।। ८४ ।। परंतु या नृसिंहजन्मव्रतासी । घेऊं नयेचि त्रयोदशी । प्रदोषकालव्यापिनी चतुर्दशी । घ्यावी शास्त्रविहित ती ।। ८५ ।। चैत्र-वैशाखमासीं वसंतऋतूत । वसंतपूजनीं करावे विप्र तोषित । तैसेंचि संततधारीं देवार्चनउक्त । उदक द्यावें

******************************************************************************

सर्वांसी ॥ ८६ ॥ वामनपुराणांतील वचन । वैशाखांत वैदिक विद्वान ब्राह्मण । सुगंध चंदन पुष्पें फलादिकींकरून । पूजावे परमभक्तीनें ॥ ८७ ॥ द्विजांसी सुगंध चंदनाची उटी । सुवासिक पुष्पहार घालावे कंठीं । पात्रीं पकान्न आम्रफलाची दाटी । पन्हें द्यावें प्राशनार्थ ॥ ८८ ॥ तैसेचि प्राशनार्थ सुगंध शीतल । अर्पावें स्वच्छ रुचिकर जल । विंझणा पंख्यासह दक्षिणा तांबूल । यथाशक्ति समर्पावे ॥ ८९ ॥ 'प्रपा' म्हणजे पाणपोया । ठेवाव्या सर्वांसी उदक प्यावया । अभिषेक करावे देवराया । तेणें घडतीं महत्पुण्यें ॥ ९० ॥ वैशाख शुद्ध पौर्णिमा तिथीस । 'कूर्मजयंती' असे सायान्हकालास । तसाचि 'पुष्करा' देवीचा जन्मदिवस । आहे विद्वांसप्रतिपादित ॥ ९१ ॥ वैशाखकृष्ण चतुर्दशीसी । 'ज्वालामुखी' चा जन्म निश्चयेंसीं । ह्या सर्व वैशाखमासीं । शंकरासी जलधारा ठेवावी ॥ ९२ ॥ समाप्त होतां वैशाखस्नान । मधुयुक्त तिलपात्रदान । छत्र पादुका दीपदान देऊन । तिलतर्पण करावें ॥ ९३ ॥ वसंतऋतूंत एकमास । तीन दिवस अथवा एक दिवस । अनुकूल असेल त्या दानव्रतास । वैशाखमासीं करावें ॥ ९४ ॥ ज्येष्ठशुद्ध प्रतिपदेपासून । 'दशहरारंभ' गंगास्नान । गंगालहरीस्तोत्रपठण-श्रवण । दशदिन नित्य करावें ॥ ९५ ॥ ज्येष्ठशुद्ध प्रतिपदेसी । करावें करवीरव्रतासी । ज्येष्ठशुक्ल द्वितीयेसी । 'बौद्ध कल्की-' अवतार असती ते ॥ ९६ ॥ ज्येष्ठ शुद्धतृतीयेसी । करावें 'रंभाव्रतासी' । ज्येष्ठशुक्लचर्तुर्थीसी । 'उमावतार' जाहला ॥ ९६ ॥ 'शुक्लादेवीपूजन' अष्टमीस । उपोषण करावें नवमीस । ज्येष्ठशुक्लदशमीतिथीस । 'गंगावतार' जाहला ॥ ९७ ॥ ज्येष्ठमास शुक्लपक्ष दशमी बुधवार । हस्तनक्षत्र व्यतीपात गर । आनंद कन्या चंद्र वृषभस्थ भास्कर । हीं 'दशहरा'संज्ञक जाणावी ॥ ९८ ॥ बुधवार आणि हस्तनक्षत्रांचा । आनंदनामक योग होतो साचा । दशमी आणि व्यतीपात् या दोहोंचा । मुख्यत्वें योग गणताति ॥ ९९ ॥ म्हणून या दशयोगांतील कित्येक । योगयुक्त ऐशी दशमी सम्यक । ज्या दिवशीं पूर्वाण्ह-कालीं व्यापक । तद्दिनीं 'दशहराव्रत' करावें ॥ १०० ॥ पूर्वाण्हकालीं दोन्ही दिवशीं । दशमी व्यापक जरी ऐशी । तरी

दहांतून बहुतयोग ज्या दिवशीं । असतील ती दशमी घ्यावी ॥ १ ॥ जरी असेल अधिकमास ज्येष्ठ । तथापि अधिकमासीं व्रत करावें हें श्रेष्ठ । द्वितीयज्येष्ठमासीं करूं मये स्पष्ट । ऐसें शास्त्र कथितसे ॥ २ ॥ या दिवशीं काशीनिवासी जे जन । त्यांनीं दशाश्वमेधतीर्थीं स्नान । करून श्रीगंगापूजन । यथाशक्ति दानधर्म करावा ॥ ३ ॥ अन्य देशांत वसणारे जे लोक । त्यांनीं संनिध नदी सरोवरादिक । असतील त्या तीर्थांत स्नान आवश्यक । गंगापूजनादिक करावें ॥ ४ ॥ कायिक पापाचे प्रकार तीन । वस्तु घेणें दिधल्यावांचून । हिंसा करणें शास्त्राज्ञेवीण । परस्त्रीगमन तृतीय तें ॥ ५ ॥ आणि वाचिक पापाचे प्रकार चार । कठोर असत्य भाषण निरंतर । चहाडी असंबद्धप्रलाप चार । ऐसीं वाचिकपापें जाणावीं ॥ ६ ॥ परद्रव्यापहरणीं सदा ध्यान । विनास्वार्थ परानिष्टचिंतन । वस्तूविषयीं असत्याग्रह करणें धारण । ऐशीं मानसिक त्रिविध पापें जाणावीं ॥ ७ ॥ यापरी कायिक वाचिक मानसिक । दशविध पापांसि होऊं नये प्रवर्तक । विवेकें भगवत्प्राप्ति आवश्यक । पुण्य मोक्ष-दायक होतसे ॥ ८ ॥ अनेक पातकें गंगास्नानें । दग्ध होती नुसत्या स्मरणें । सकल पितर उद्धरती दर्शनें । भव-मुक्तता होय गंगाकृपें ॥ ९ ॥ ज्येष्ठशुक्ल द्वादशीस । 'कूर्मजयंती' सायान्हीस । युगपरत्वें वर्णिती विद्वांस । धर्मादि ज्योतिषग्रंथांत ॥ ११० ॥ आषाढशुद्ध प्रतिपदा । 'वैद्यनाथजयंती' असे तदा । आषाढशुक्ल एकादशीस सदा । 'मत्स्यजयंती' म्हणताति ॥ ११ ॥ आषाढशुद्धएकादशी महातिथी । तद्दिनीं सायान्हीं मत्स्यजयंती । उपोषण देवार्चन शुद्ध चित्तीं । पुराण कीर्तनादि आचरावें ॥ १२ ॥ हरिपूजन करूनि एकादशीउपवास । पुंडरीक-निर्मित क्षेत्रीं ज्याचा निवास । त्या 'श्रीविठ्ठलपांडुरंग'-दर्शनें मानवास । वांछितार्थ मुक्ति प्राप्त होतसे ॥ १३ ॥ या एकादशीस ईश्वरपूजा करून । श्रीभगवंताचे संनिध बैसून । चातुर्मासिक काम्य नित्य व्रत जाण । अथवा पारणोत्तर संकल्पावें ॥ १४ ॥

आषाढशुद्ध पौर्णिमा तिथी । 'व्यास-गुरुपूजा पौर्णिमा' म्हणती । सूर्योदयापासून सहा घटिका असेल ती । घ्यावी गुरु-व्यासपूजेस ॥ १५ ॥ याच पौर्णिमेच्या ठायीं । 'कोकिलाव्रत' 'शिवशयनोत्सवादि' हीं । करावयासि पौर्णिमा पाहीं । प्रदोषव्यापिनी घ्यावी ती ॥ १६ ॥ श्रावणशुक्लतृतीयेस । हरीनें धरिलें कूर्मावतारास । तैशापरीच या तिथीस । 'मंगलागौरीचा' जन्म म्हणती ॥ १७ ॥ श्रावणशुद्धषष्ठी दिनीं । 'कल्कीजयंती' असे सायान्हीं । श्रावण शुद्ध पौर्णिमा दिनीं । 'हयग्रीवोत्पत्ति' जाहली ॥ १८ ॥ या पौर्णिमेस ब्राह्मणांची श्रावणी । उपाकर्मोत्सर्ग करिती होमहवनीं । 'नारळी पौर्णिमा' वर्णिती जनीं । रक्षाबंधन करावें ॥ १९ ॥ श्रावणकृष्ण प्रतिपदातिथीस । 'विंध्याचलजयंती' वर्णिती विद्वांस । आणि 'भीमचंडीजयंती'ही सुरस । असे याच प्रतिपदेसी ॥ १२० ॥ श्रावणकृष्ण षष्ठीस । 'हरदेवजयंती' म्हणती विद्वांस । श्रावणकृष्ण सप्तमीस । 'सीताजन्म' जाहला ॥ २१ ॥ श्रावणकृष्णाष्टमीतिथी । हिला 'कृष्ण-जन्माष्टमी' म्हणती । ही दोनप्रहररात्रीस असेल ती । घ्यावी श्रीकृष्णजन्मास ॥ २२ ॥ पूर्व दिवशीं मध्यान्हरात्रीस । असेल अष्टमी ती घ्यावी जन्मोत्सवास । किंवा दुसरे दिवशीं मध्यरात्रीस । असेल तरी ती घ्यावी ॥ २३ ॥ मध्यान्हव्यापिनी दोन्ही दिवशीं । असतां दुसरीच करावी आदरेंसीं । आणि दोन्ही दिवशीं अर्धरात्रीसी । नसल्यास दुसरी करावी ॥ २४ ॥ स्थूलदृष्टीनें आठवा मुहूर्त । तयासीच 'निशीथ' ( मध्यरात्र ) म्हणतात । अष्टमीस रोहिणी असतां शास्त्रांत । जयंती मानिली चार प्रकारें ॥ २५ ॥ पूर्वदिवशीं मध्यान्हरात्रकालीं । रोहिणीनक्षत्रयुक्त अष्टमी असली । तरी पहिलीच पाहिजे केली । कृष्णजयंतीकारणें ॥ २६ ॥ दुसरे दिनीं निशीथ समयासी । अष्टमी रोहिणीयुक्त ऐशी । आली असतां त्या दिवशीं । 'कृष्णजन्माष्टमी' करावी ॥ २७ ॥ दोन्ही दिवशीं मध्यरात्रीं । अष्टमी असतां रोहिणीनक्षत्रीं । तरी दुसरे दिवशीं शास्त्रीं । वर्णिलेली करावी ॥ २८ ॥ पूर्वदिनीं अष्टमी मध्यरात्रीस ।

आणि दुसरे दिवशीं रोहिणी निशीथकालास । ऐशी आली असतां करावी खास । माधवमतें दुसरे दिनीं ॥ २९ ॥ हेमाद्रिमतें पूर्व दिवशीं । कमलाकरमतें दोन्ही दिवशीं । करावें जयंतीउपोषणासी । जागरणउत्साह-कृष्णपूजा ॥ १३० ॥ रोहिणीनक्षत्र पूर्वदिनीं । दुसरे दिवशीं अष्टमी रात्रीं मध्यान्हीं । ऐशी आली असतां जनीं । घ्यावी दुसरे दिवसाची ॥ ३१ ॥ दोन्ही दिवशीं मध्यरात्रीस । अष्टमी आणि रोहिणी नसल्यास । दुसरे दिवशींच अष्टमी उपवास । करावा शास्त्रविहित ॥ ३२ ॥ या अष्टमीस रोहिणी नक्षत्र । आणि आलिया बुध किंवा सोमवार । त्यांतही नवमी असतां फल थोर । मुक्तिदायक वर्णिलेंसे ॥ ३३ ॥ गोकुलाष्टमीचें काम्यनित्यव्रत । न केलिया होय नरक प्राप्त । केलें असतां सर्व कार्यें सिद्ध होत । म्हणून अवश्य करावें ॥ ३४ ॥ या व्रताचे दिवशीं उपोषण जागरण । करावें मुख्यत्वें श्रीकृष्णपूजन । मृत्तिकादि अथवा सुवर्ण । श्रीकृष्णप्रतिमा करूनियां ॥ ३५ ॥ आपल्या कुलाचारानुसार । कृष्णप्रतिमापूजन-उत्साह यथाशास्त्र । चंद्रपूजनादिक करावें समंत्र । वेदघोष कीर्तनपुराणादि ॥ ३६ ॥ अष्टमीउपोषण करणारे नारीनर । तिहीं अष्टमीतिथी संपल्यानंतर । देवब्राह्मणांसी नैवेद्य प्रथम साचार । अर्पूनि पारणा करावी ॥ ३७ ॥ रोहिणीनक्षत्रयुक्त अष्टमीस । ज्यांनीं केला असेल उपवास । नक्षत्र आणि तिथीच्या अंतीं त्यांस । पारणें केलें पाहिजे ॥ ३८ ॥ अष्टमी आणि रोहिणी या दोहोंतून । एक दिवसां आणि द्वितीय रात्रीं संपूर्ण । असतां सोडावें उपोषण । द्वितीयदिनीं दिवा किंवा रात्रीस ॥ ३९ ॥ दिवसां तिथि आणि नक्षत्र जेव्हां । दोहोंतून एक संपत असेल तेव्हां । उपोपितांनीं उपवास सोडावा । नैवेद्यार्पण करूनि ॥ १४० ॥ जेव्हां दिवसां एकही संपत नाहीं । तेव्हां मध्यरात्रीच्यापूर्वीं लवलाहीं । एकाच्या समाप्तिकालीं पाहीं । पारणा अवश्य करावी ॥ ४१ ॥ मध्यरात्रीच्या पूर्वीं किंचित् । होत असल्यास अष्टमी तिथ्यन्त । अथवा होतां नक्षत्रान्त । तदा पारणें सोडावें ॥ ४२ ॥ रात्रीं असंभव

भोजनाचा । असल्यास आहार फलादिकांचा । करूनि उपवास सोडावा साचा । म्हणजे पारणा होतसे ॥ ४३ ॥ श्रावणकृष्णाष्टमीस वृषभलग्नीं । सिंहराशीचा रवि मध्यरजनीं । पंचग्रह उंच्च बलीय असूनि । वृषभराशीस चंद्र होता ॥ ४४ ॥ स्वगृहीचे चतुर्ग्रह अति बलवान । तेव्हां अवतरले पूर्णब्रह्मकृष्णभगवान् । कंसादि दानवांचें व्हावया निधन । आणि भूभार उतरावयासी ॥ ४५ ॥ भक्तपांडवादिकांच्या हितार्थ । आणि दुष्ट कौरवादि-विनाशार्थ । धर्मसंस्थापनार्थ श्रीकृष्णनाथ । जगदुद्धरणार्थ अवतरले ॥ ४६ ॥ श्रावणकृष्णाष्टमीदिनीं । 'शीतलाजन्म' म्हणती कोणी । श्रावणकृष्णनवमीदिनीं । 'कर्दमजन्म' बोलती ॥ ४७ ॥ श्रावणकृष्णत्रयोदशीतिथी । ते दिवशीं झाली 'कलियुगोत्पत्ति' । अमावास्येसि 'पिठोरीव्रत' करिती । प्रदोषव्यापिनी लक्षुनी ॥ ४८ ॥ भाद्रपदशुक्लद्वितीयातिथी । ते दिनीं असे 'बलभद्रजयंती' । शुक्लतृतीयेस 'हरितालिकाव्रत' करिती । मध्यान्हीं करिती 'मंगलागौरीजन्म' ॥ ४९ ॥ तृतीया हरितालिकाव्रतासी । मुहूर्तमात्र असतां दुसरे दिवशीं । चतुर्थीयुक्त प्रशस्त ऐशी । घ्यावी शिवपार्वती-पूजनाला ॥ १५० ॥ पूर्णतृतीया त्यजावी । चतुर्थीयुक्त अवश्य घ्यावी । क्षयकारणें चतुर्थीयुक्त अभावीं । घ्यावी द्वितीयायुक्त तदा ॥ ५१ ॥ या व्रतदिनीं स्त्रियांनीं उपोषण । श्रीशंकरपार्वतीचें पूजन । हरितालिकाकथाश्रवण । करावें जागरण रजनीसी ॥ ५२ ॥ भाद्रपदशुक्ल चतुर्थीदिनीं । 'गणेशजयंती' मध्यान्हव्यापिनी । 'गणेशचतुर्थी' म्हणती जनीं । सिद्धिविनायकव्रत असे ॥ ५३ ॥ दोन्ही दिवशीं संपूर्ण मध्यान्हीं असेल । अथवा जरी तैशी नसेल । तरी पूर्वीची ग्रहण करूनि प्रांजल । व्रत पूजनादिक आचरावें ॥ ५४ ॥ दोन्ही दिवशीं मध्यान्हकालीं । सारखेपणें चतुर्थी असली । अथवा न्यूनाधिकत्वें एकभाग आली । तरी पूर्वीचीच घ्यावी ॥ ५५ ॥ कित्येक ग्रंथकारांचें असें मत । न्यूनाधिकपणें चतुर्थीव्याप्त । अथवा अधिकव्यापिनी असत । तरी दुसरीच घ्यावी ॥ ५६ ॥ दिवसा मध्यान्हीं सर्वथा

स्पर्श नाहीं । दुजे दिनीं मध्यान्हव्यापिनी तरीही । दुसरीच घ्यावी पाहीं । मध्यान्हकालव्यापिनी चतुर्थी ॥ ५७ ॥
पूर्वदिवशीं एकदेश असे मध्यान्हीं । आणि दुसरे दिवशीं संपूर्ण मध्यान्हव्यापिनी । असतां चतुर्थी दुसरे दिनीं ।
घ्यावी सप्रमाण ते परिसा ॥ ५८ ॥ गणेश व्रत चतुर्थी दिनीं । तृतीयायुक्त मध्यान्हकालव्यापिनी । असेल ती
प्रशस्त जाणिजे जनीं । चतुर्थी नसतां पंचमीविद्ध घ्यावी ॥ ५९ ॥ हाचि निर्णय इतरमासीं । जाणावा शास्त्र-
प्रमाणेंसीं । ही चतुर्थी रवि-भौमवारयुक्त असतां ऐशी । विघ्नेशार्चनीं मोठी प्रशस्त ॥ १६० ॥ गणेशचतुर्थीस
चंद्रदर्शन । झालिया येतसे मिथ्याभिदूषण । तद्दोषशांत्यर्थ करावें पठण । सिंहप्रसेन-श्लोकांचें ॥ ६१ ॥ या चतुर्थीस
भावें मृण्मयादिक । मूर्ति पूजावी सिद्धिविनायक । मोदक-नैवेद्यार्पण देख । ब्राह्मणभोजनादिक करावें ॥ ६२ ॥
सिद्धिविनायकें प्रगटून । सिंदूरासुराचें केलें मर्दन । सर्व कार्यारंभीं करावें तत्पूजन । तेणें कार्यसिद्धि निर्विघ्न होतसे
॥ ६३ ॥ भाद्रपद शुक्ल तृतीया दिनीं । वराहजयंती अपराण्हीं । भाद्रपद शुक्ल पंचमीस कोणी । कल्पभेदें म्हणताति
॥ ६४ ॥ हीच 'ऋषिपंचमी' मध्यान्हव्यापिनी । ऋषिपूजनासी घ्यावी जनीं । दोन्ही दिवशीं पंचमी मध्यान्हव्यापिनी ।
असतां वा नसतां पूर्वीचीच घ्यावी ॥ ६५ ॥ या पंचमीस ऋषिपूजन करून । नांगरल्यावांचून जी जमीन ।
तींत मनुष्यहस्तें झालेलें उत्पन्न । तण्डुल शाकादिक भक्षावें ॥ ६६ ॥ भाद्रपद शुक्ल सप्तमीदिन । 'राधाजन्म'
वर्णिती विद्वान् । भाद्रपदअष्टमी दिन । 'ज्येष्ठादेवी'-जन्म कोणी म्हणती ॥ ६७ ॥ या अष्टमीस ज्येष्ठादेवीचें पूजन । अष्टमी
किंवा ज्येष्ठा नक्षत्र प्राधान्य । व्रत आचरावें भावें करून । स्त्रीजनीं मंगलप्रद ॥ ६८ ॥ अनुराधा नक्षत्रीं आवाहन । ज्येष्ठा
नक्षत्रीं देवीपूजन । मूल नक्षत्रीं करावें विसर्जन । त्रयदिनात्मक हें व्रत ॥ ६९ ॥ भाद्रपद शुक्ल द्वादशीदिनीं । श्रवण
नक्षत्रयुक्त मध्यान्हीं । 'वामनजयंती' म्हणती जनीं । अवतार पंचम श्रीहरीचा ॥ १७० ॥ या व्रतास मध्यान्हकालव्यापिनी ।

अथवा द्वादशी जी असेल मध्यान्हीं । किंवा अन्यत्र कालीं नक्षत्रश्रवणीं । युक्त असेल ती घ्यावी ॥ ७१ ॥ उभय दिनीं श्रवणनक्षत्राचा योग । असतां पूर्वींचीच घेणें योग्य । किंवा सर्व प्रकारें श्रवण साङ्ग । द्वादशीस नसल्यास ॥ ७२ ॥ म्हणजे मध्यान्हव्यापिनी द्वादशीस । श्रवणाभाव असल्यास । ती द्वादशी टाकून खास । श्रवणयुक्त एकादशीस व्रत करावें ॥ ७३ ॥ शुद्ध एकादशीस श्रवण नसल्यास । आणि दशमीविद्ध एकादशीस । श्रवण नक्षत्र असल्यास । ते दिवशीं व्रत करावें ॥ ७४ ॥ पूर्वदिनीं द्वादशी ( मध्यान्हव्यापिनी ) । आणि दुसरे दिवशीं मध्यान्हाहूनि । अन्यत्रकालींयुक्त श्रवणीं । असतां पूर्वींचीच करावी ॥ ७५ ॥ दोन्ही तिथींचेठायीं श्रवण-। नक्षत्राभाव असल्या जाण । मध्यान्हव्यापिनी द्वादशीस जन । करा हो व्रत भक्तीनें ॥ ७६ ॥ दोन्ही दिवशीं मध्यान्हकालीं । द्वादशीची व्याप्ति असली वा नसली । तरी एकादशीयुक्त पाहिजे घेतली । श्रीभगवान् वामनव्रतासी ॥ ७७ ॥ तिथिनक्षत्रांच्या अंतीं । पारणा करावी पूर्वोक्तरीतीं । या दिवशीं मध्यान्हीं नदीसंगमतीर्थीं । करावें स्नान अवश्य ॥ ७८ ॥ श्रीभगवान् विष्णुरूपी वामन । सुवर्णप्रतिमेची पूजा करून । सुवर्ण छत्रादि समंत्रदान । द्यावें सदाचारी द्विजांसी ॥ ७९ ॥ भाद्रपद शुक्ल अनंतचतुर्दशी । द्विमुहूर्तव्यापिनी घेतां सूर्योदयासी । चतुर्दशग्रंथीयुत दोरकानंतासी । पूर्वाण्हीं पूजितां फलप्रद ॥ १८० ॥ भाद्रपदकृष्णषष्ठी तिथी । 'कपिलाषष्ठी' जयंती कोणी म्हणती । भाद्रपदकृष्णाष्टमीस मध्यान्हीं वदती । 'गजगौरीजन्म' 'दुर्गाष्टमी-महालक्ष्मी'-दर्शन ॥ ८१ ॥ आश्विनशुक्लप्रतिपदा । सूर्योदयव्यापिनी नवरात्रारंभासि तदा । अमावास्या वर्जूनि प्रतिपदा । एकद्विमुहूर्त घेईजे ॥ ८२ ॥ आश्विन शुक्लपंचमीतिथी । कोणी 'उपांगललितादेवी-जन्म' वदती । अपराण्हव्यापिनी ललितापूजार्थ घेती । कित्येक रात्रव्यापिनी पंचमी ती ॥ ८३ ॥ आश्विन शुक्ल सप्तमीस । 'गरुडजन्म' वर्णिती विद्वांस । पत्रिकापूजा करणें या

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

सप्तमीस । म्हणती 'सरस्वती-जन्म' कोणी ॥ ८४ ॥ आश्विन शुद्ध अष्टमीला । 'भद्रकाली' देवीचा अवतार झाला । आश्विन शुद्ध नवमीला । 'दुर्गादेवीचा' जन्म असे ॥ ८५ ॥ आश्विन शुक्लांत मूलाचे प्रथमपादीं । सूर्यास्तापूर्वीं 'सरस्वतीचें' आवाहन आदि । पूर्वाषाढांत दिवसा करावें पूजनादि । उत्तराषाढांत बलिदान कीजे ॥ ८६ ॥ प्रथमपादीं नक्षत्रश्रवण । असतां करावें सरस्वती-विसर्जन । सरस्वती-स्थापनेपासून । विसर्जन होईतोंपर्यंत ॥ ८७ ॥ अध्ययन अध्यापन लेखन । अनध्याय पाळावा जाण । विद्येच्छु जे असती जन । त्यांहीं अध्ययनादि वर्जावें ॥ ८८ ॥ आश्विन शुक्ल महाष्टमी । सूर्योदयव्यापिनी घ्यावी संयुक्त नवमी । सर्वथा वर्जावी युक्तसप्तमी । भौमवार असतां पुण्यकारक ॥ ८९ ॥ आणि बलिदान-कर्माकरितां । दशमीयुक्त नवमी घ्यावी तत्त्वतां । नवमीस पारणें करितां । देवी कुलवृद्धि करितसे ॥ १९० ॥ दशमीस शारदोत्सव असे म्हणून । करावें भगवतीदेवीचें पूजन । कुलाचारानुसार विसर्जन । पारणा करावी तैशीच ॥ ९१ ॥ दशमीस श्रवण नक्षत्र नसतां । अपराण्हव्यापिनी घ्यावी नवमीयुक्ता । नवमीयुक्त दशमीस 'अपराजिता' । देवीपूजन विजयप्रद ॥ ९२ ॥ दोन्ही दिवशीं असतां श्रवण । दशमी अपराण्हकाल व्यापून । तेव्हां पूर्वींची घ्यावी अथवा श्रवण । असतां दुसरे दिवशीं करावी ॥ ९३ ॥ श्रवणयुक्त दशमीस । काकुस्थराजानें केलें सीमोल्लंघनास । म्हणूनि सर्वांनीं विजयादशमीस । सीमोल्लंघन करावें ॥ ९४ ॥ दोन्ही दिवशीं अपराण्हकालीं । दशमीव्याप्त असतां करावी पहिली । दोन्ही दिवशीं प्रदोषकालीं । व्याप्त असतां घ्यावी दुसरीच ॥ ९५ ॥ दशमीचा स्पर्श दोन्ही दिवशीं । असतां अपराण्हाच्या एकभागासी । तेव्हां पहिली घ्यावी देवीपूजनासी । सीमोल्लंघन शमीपूजनादि करावें ॥ ९६ ॥ अपराण्हकालीं दशमी नसतां । घ्यावी जी असेल श्रवणयुक्ता । शमीवृक्ष नसल्यास अश्मंतक तत्त्वतां । आपट्याची पूजा करावी ॥ ९७ ॥ आश्विनशुक्ल दशमीदिनीं ।

'बौद्धजयंती' असे सायान्हीं। ही विजयादशमी शुभ प्रयाणीं। श्रवणयुक्त विशेष आहे ॥ ९८ ॥ आश्विनशुक्ल पौर्णिमेसी भले । ते 'अश्विनीकुमार' जन्मले। या पौर्णिमेला रात्रीं उद्भवले । 'श्रीमहालक्ष्मीनारायण' ॥ ९९ ॥ आश्विनशुक्ल पौर्णिमा 'कोजागरी'-। व्रतासी घ्यावी व्यापिनीमध्यरात्री। 'वरदालक्ष्मी' पूजन करूनि प्रेमभरीं। प्रसाद ग्रहण करावा ॥ २०० ॥ ऐरावतस्थि-रलक्ष्मींद्रांचें पूजन। द्यूतकर्में करावें जागरण। 'कोण जागृत आहे' ऐसें लक्ष्मी बोलून। धनादिक वर देते जागृतांसी ॥ १ ॥ ज्येष्ठापत्यासि ओवाळावें निरांजनीं। करावें 'आश्वयुजीकर्म' आश्वलायनीं। कृष्ण द्वादशी प्रदोषव्यापिनी। ते दिनीं 'सवत्स-गौपूजन' करावें ॥ २ ॥ आश्विन कृष्ण त्रयोदशीला। 'कामेश्वराचा' जन्म झाला। आश्विन कृष्णचतुर्दशीला। 'हनुमज्जन्म' वदती कोणी ॥ ३ ॥ आश्विनकृष्णत्रयोदशी दिवशीं। सायंकाळीं गृहाबाहेर लावावें यमदीपासी। तेणें अपमृत्यु पावे नाशासी। श्रीयमाच्या प्रसादें ॥ ४ ॥ आश्विनकृष्ण 'नरकचतुर्दशी'। चंद्रोदयव्यापिनी घ्यावी अभ्यंगस्नानासी। करावें यम-भीष्म-तर्पण दीपोत्सवासी। विप्रांसह भोजन करावें ॥ ५ ॥ आश्विनकृष्णअमावास्या दीपावली। लक्ष्मीपूजनासि घ्यावी सायंकालीं। 'महालक्ष्मी-सरस्वती-महाकाली'-। पूजनें धनधान्यादि लाभतसे ॥ ६ ॥ कार्तिकशुद्धप्रतिपदादिवशीं। 'बलिपूजा' दीपोत्सव गोक्रीडनकासी। 'अन्नकूटगोवर्धनपूजनासी'। श्रद्धाभक्तियुक्त करावें ॥ ७ ॥ चतुर्दशी अमाप्रतिपदेसी तैलाभ्यंगस्नान। नूतन वस्त्रालंकार धारण। द्यूत खेळणें ओवाळणें निरांजन। मंगलमालिकादि कृत्यें करावीं ॥ ८ ॥ यदर्थी प्रतिपदा दशमुहूर्त। सूर्योदयापासून व्यापिनी घेईजेत। नवमुहूर्तांतही न्यून असत। 'शिवरात्र' आणि 'बलिप्रतिपदा' ॥ ९ ॥ अठरा घटिकांत नून असतां यदा। अमावास्यायुक्त प्रतिपदा तदा। शिवरात्र आणि बलिप्रतिपदा। घ्यावी पूजनादिकांसी ॥ २१० ॥ अभ्यंगस्नान नववस्त्रादि धारण। द्यूतकर्म नारीकर्तृकनिरांजन। या

कार्यास्तव सूर्योदयीं घटिका दोन। असणारी प्रतिपदा घ्यावी ।। ११ ।। या दिवशीं लक्ष्मीपूजन । आणि कुबेराचें पूजन करून। द्यूत खेळावें हर्षें जाण। जयपराजय-फल संवत्सरपर्यंत जाणावें ।। १२ ।। कार्तिकशुक्ल द्वितीया तिथी। कोणी 'यमजयंती' म्हणती। या दिवशीं पूर्वीं यमुनेनें यमाप्रति । स्वगृहीं भोजन घातलें ।। १३ ।। म्हणून यमद्वितीया म्हणती जन । अतएव या दिवशीं भगिनीहस्तें भोजन । केलिया होतसे धनलाभ पुष्टिवर्धन । स्वभगिनी-अभावें तत्सम स्त्रिया जाणाव्या ।। १४ ।। तयांच्या गृहीं करूनि भोजन । सत्कार करावा धनादिकेंकरून । म्हणजे होतसे लाभ-पुष्टिवर्धन । सशास्त्र विधान हें आहे ।। १५ ।। ही यमद्वितीया अपराण्हकालीं असतां । तरी पूर्व दिवसाची घ्यावी तत्त्वतां । दोन्ही दिवशीं अपराण्हीं असतां वा नसतां । स्वीकारावी दुसरीच ।। १६ ।। कार्तिकशुक्ल दशमीस । करिती 'यमुनाजयंती' आणि यमपूजनास। कार्तिक शुद्ध द्वादशीस। 'प्रबोधोत्सव'-'तुलसीविवाह'-'चातुर्मास्य-समाप्ति' ।। १७ ।। कार्तिक शुक्ल 'वैकुंठचतुर्दशीस'। पूर्व दिवशीं करूनि उपवास । दुसरे दिवशीं अरुणोदय कालास। असणारी जी चतुर्दशी ।। १८ ।। त्या चतुर्दशीचे ठायीं श्रीशंकरपूजन। करून प्रातः करावें पारण। म्हणजे अरुणोदययुक्त चतुर्दशीदिन । ऐशा अहोरात्रीस उपोषण घडतें ।। १९ ।। सूर्योदयापूर्वीं घटिका चार । त्यास 'अरुणोदय' संज्ञा आहे सशास्त्र । उदाहरण त्रयोदशी चोपन घटिकानंतर । सत्तावन घटिका चतुर्दशी ।। २० ।। त्या चतुर्दशीस अरुणोदययुक्त अशी । जी असेल त्रयोदशी । त्या त्रयोदशीस करून उपोषणासी । चतुर्दशीस प्रातः शिवपूजन पारणा करावी ।। २१ ।। दोन्ही दिवशीं अरुणोदयकालीं । चतुर्दशीची व्याप्ति असली । तरी पूर्वदिवशीं उपोषण करून चांगली । शिवपूजा दुजेदिनीं अरुणोदयीं करावी ।। २२ ।। दोन्ही दिवशीं चतुर्दशी अरुणोदयास। नसल्यास पूर्वदिवशीं करावा उपवास । चतुर्दशीयुक्त अहोरात्रीच्या अरुणोदयास । शिव पूजूनि पारणा करावी ।। २३ ।। कोणी ही

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ

चतुर्दशी निशीथ-व्यापिनी । स्वीकारिती विष्णुपूजनीं । दोन्ही दिवशीं असेल मध्यरात्र-व्यापिनी । तरी मध्यरात्रीं आणि प्रदोष-व्यापिनी घ्यावी ॥ २४ ॥ वैकुंठचतुर्दशी विश्वेश्वर-प्रतिष्ठादिन । उपवास आणि दीपदान । जागरण नृत्य वाद्यगायन । परमेश्वरचरित्रपठण करावें ॥ २५ ॥ कार्तिकशुक्लपौर्णिमा तिथी । कोणी 'कार्तिकस्वामीची' जयंती म्हणती । कोणी 'मत्स्यावतार'ही वानिती । समाप्ति चातुर्मास्य व्रताची ॥ २६ ॥ कार्तिकस्नान समाप्त । 'भीष्मपंचक' पूर्ण होतसे व्रत । कृत्तिका नक्षत्रयोगें महापुण्य देख । रोहिणीयोगें महाकार्तिकत्व होतसे ॥ २७ ॥ कार्तिकशुक्ल पौर्णिमेच्या दिवशीं । असतां कृत्तिकानक्षत्र शुद्धमानसीं । जो द्विज जाईल कार्तिकस्वामिदर्शनासी । महापुण्य तया लाभेल ॥ २८ ॥ तो ब्राह्मण सप्तजन्मपर्यंत । श्रीमान् वेदपारंगत । या पौर्णिमेस समाप्ति होत । 'आकाशदीप-त्रिपुरोत्सवादि' ॥ २९ ॥ म्हणती कार्तिककृष्णाष्टमी तिथी । मध्यान्हकालव्यापिनी घ्यावी ती । आहे 'कालभैरवाची' उत्पत्ति । अनवद्य उग्रमूर्ति सर्वत्र वंद्य असे ॥ २३० ॥ ही अष्टमी पौर्णिमान्तमासपक्षें पाहीं । मार्गशीर्ष कृष्णाष्टमी योग नाहीं । 'कालभैरवाष्टमी'व्रतासि सर्वदाही । मध्यान्हव्यापिनी मुख्यत्वें असे ॥ ३१ ॥ बहुशिष्टानुचारान्वयें जाण । प्रदोषव्यापिनी घ्यावी हो जन । दोन्ही दिवशीं असतां प्रदोषकाल व्यापून । तदा पूर्वीचीच घ्यावी ॥ ३२ ॥ या कालाष्टमीस उपोषण । करावें श्रीकालभैरवाचें पूजन । अभीष्टप्रद श्रद्धाभक्तीनें जागरण । करावें पारणें शास्त्रोक्त ॥ ३३ ॥ मार्गशीर्षशुक्लपंचमीदिनीं । 'बलदेवजयंती' असे सिंहलप्रीं । ही पंचमी नागपूजनीं । षष्ठीयुक्त घ्यावी हें उक्त ॥ ३४ ॥ श्रावण मार्गशीर्ष शुक्ल नागपंचमीस । स्नान-दानें पुण्य लाभे विशेष । आणि नागलोकीं होय निवास । ऐसें स्कंदपुराणीं फल बोलिलें ॥ ३५ ॥ श्रावण मार्गशीर्ष या द्वयमास व्यतिरिक्त । अन्यकार्यासी शुक्ल पंचमी चतुर्थीयुक्त । घ्यावी सर्वदा हें शास्त्रोक्त । वचन ग्रहण करावें ॥ ३६ ॥ मार्गशीर्षशुक्ल षष्ठीस रविवारीं । चंद्र असे शततारका-नक्षत्रीं । प्रत्यक्ष प्रगटले 'श्रीशिवमल्लारी' ।

पूर्वाण्हकालीं जयंती असे ॥ ३७ ॥ कैलासाहूनि जेजुरीक्षेत्रीं । प्रथम पातले कडेपठारीं । मणिमल्लविनाशार्थ शिवमल्लारी । परित्राणार्थ भक्तसाधूंच्या ॥ ३८ ॥ वधूनि दुष्ट निशाचर । संरक्षिलें हें संपूर्ण चराचर । करुणार्णव सदाशिवावतार । कनकगिरीसमान विराजे ॥ ३९ ॥ शिवमल्लारीचीं स्थानें बहुत । जेजुरीक्षेत्र मुख्य सुशोभित त्यांत । परमेश्वर म्हालसाकांत । दर्शनेंचि समाधान वाटतसे ॥ २४० ॥ अगणित नित्य भंडार खोबरें । उधळती प्रेमें लोक सारे । सदानंदाचा उदय उच्चस्वरें । गर्जती फलार्थ पावती ते ॥ ४१ ॥ विशाखा भौमवारयोगेंकरून । हिचें वर्णिती 'चंपाषष्ठी' नामाभिधान । किंवा रवि भौमवार शततारका असून । वैधृतीयोग असेल ॥ ४२ ॥ म्हणजे मार्गशीर्षमास पक्षशुक्ल । षष्ठीतिथी रवि किंवा वार मंगल । शततारका नक्षत्र वैधृतीयोग निर्मल । हे सहा मिळून चंपाषष्ठी ॥ ४३ ॥ ही षष्ठी दोन्ही दिवशीं व्याप्त । सूर्योदयापासून सहा घटिकापर्यंत । असतां जी अधिक योगयुक्त । असेल ती स्वीकारिजे ॥ ४४ ॥ ती प्रथम किंवा दुसरे दिवशीं नियेंश्वसीं । सांगितलेल्या योगांच्या अभावासी । (?) असतां दुसरी स्वीकारिजे ॥ ४५ ॥ म्हणजे दोन्ही दिवशीं योगांचा अभाव । तरी त्रिमुहूर्त-व्यापिनी घ्यावी परैव । चंपाषष्ठी कुलधर्मोत्सव । करिती प्रसन्न शिव होतसे ॥ ४६ ॥ ह्या षष्ठीस 'स्कंदजयंती' कोणी म्हणती । पूजनार्थ पूर्वीचीच घेती । मार्गशीर्षशुक्ल सप्तमीस करिता । 'सूर्यव्रत' विध्युक्त ॥ ४७ ॥ मार्गशीर्ष शुक्ल चतुर्दशी तिथी । असे 'श्रीदत्तात्रेयावतारजयंती' । वृद्धवशिष्ठवामदेवादि सांगती । प्रदोषव्यापिनी घेइजे ॥ ४८ ॥ दत्तपुराणादिकीं प्रमाण । आणि भृग्वादि ऋषींचें वचन । मार्गशीर्ष शुक्ल चतुर्दशीस अवतीर्ण । जगद्गुरु दत्तात्रेय जाहले ॥ ४९ ॥ बुध किंवा मंदवासरीं । प्रदोषकालीं रोहिणी नक्षत्रीं । षड्ग्रह स्वोच्च वृषभलग्नीं साचारी । चंद्र वृषभराशीस असतां तदा ॥ २५० ॥ परमात्मा पूर्णब्रह्म सनातन । श्रीगुरुदेव दत्त-भगवान् । जगदोद्धारार्थ प्रत्यक्ष अवतीर्ण । जाहले अत्रिऋषिसदनांत ॥ ५१ ॥ स्कंदपुराणांतील वचनीं । मार्गशीर्ष शुक्ल पौर्णिमेस

सायान्हीं । रविवारीं अनसूयेलागुनी । महत्तेजस्वी पुत्र प्राप्त जाहला ॥ ५२ ॥ अत्रिऋपि विलोकून लवलाहें । म्हणती हा पुत्र प्रत्यक्ष परमेश्वर आहे । विधि-हरि-हर देवत्रयांचें हें । वरप्रदान सफल जाहलें ॥ ५३ ॥ महाविष्णूनें आपल्यास स्वतां । आत्मरूप पुत्र दिधला जगद्धिता । म्हणूनि 'दत्तात्रेय' ऐसें नाम तत्त्वता । ठेविलें प्रेमें या जगद्गुरूचें ॥ ५४ ॥ या दिवशीं करावें उपोषण । श्रीमद्दत्तात्रेय-गुरूचें विध्युक्त पूजन । वेदघोषपुराणकीर्तनगायन । शुद्ध भक्तीनें जागरण करावें ॥ ५५ ॥ जयंत्योत्सव समारंभें करून । यथाशक्ति पारणें ब्राह्मण भोजन । करावें म्हणजे सर्वदा प्रसन्न । दत्तात्रेय जगदीश्वर होतसे ॥ ५६ ॥ मार्गशीर्ष कृष्णाष्टमी तिथी । माध्यान्हीं असे 'कालभैरवोत्पत्ति' । ऐशीं वचनें शिवरहस्यग्रंथीं । वर्णिलीं असतीं स्पष्टत्वें ॥ ५७ ॥ पौषशुक्ल पौर्णिमा-तिथी । आहे 'शाकंबरीव्रत' जयंती । माघस्नानारंभ करिती । एकादशी वा पौर्णिमेपासून ॥ ५८ ॥ पौष शुक्लैकादशी किंवा पौर्णिमेपासून । अथवा मकरसंक्रमण लक्षून । दुःखदारिद्र्यनाशार्थ करावें 'माघस्नान' । तेणें भगवंत तुष्ट होतसे ॥ ५९ ॥ माघशुक्ल द्वादशी पौर्णिमेपूर्वी समापन । किंवा कुंभसंक्रमणापर्यंत करावें माघस्नान । नद्यादि तीर्थीं कोठेंही स्नानकालीं जन । करा हो स्मरण प्रयागराजाचें ॥ २६० ॥ पौर्णिमान्तमास-पक्षेंकरून । पौषकृष्ण चतुर्थीस जन्मले 'गजानन' । सर्व देवस्वरूप साक्षात् भगवान् । सर्वमंगलकारक ऐसे ॥ ६१ ॥ पौषकृष्ण अमावास्येस । असे 'लीलाकालीचा' जन्मदिवस । या अमावास्येसी दिवसास । आलिया 'अर्धोदयपर्व' घ्यावें ॥ ६२ ॥ पौष किंवा माघी अमावास्यादिनीं । रविवार व्यतीपात् श्रवण नक्षत्र मिळुनी । हीं आलीं असतां अर्धोदयपर्वणी । कोटि सूर्यग्रहणासमान असे ॥ ६३ ॥ यांतील कांहीं योग असतां न्यून । त्यासी 'महोदयपर्व' म्हणती कोणी जन । हा अर्धोदययोग दिवसांच प्रशस्त जाण । रात्रीं कधींही घेऊं नये ॥ ६४ ॥ हें प्राप्त झालें असतां अर्धोदय । गंगेसारिखें सर्व तोय । ब्रह्मदेवत्व प्राप्त

होय । सर्व ब्राह्मणां त्याकालीं ।। ६५ ।। या अर्धोदयपर्व-कालांत । जें दान घडेल किंचित् । तें मेरुपर्वतप्राय होत । शास्त्रनिर्णय निश्चयेंसीं ।। ६६ ।। स्कंदपुराणवचनानुसार । माघी अमावास्या दिवशीं रविवार । आणि असतां व्यतीपात् श्रवणनक्षत्र । त्यासी अर्धोदयपर्व म्हणती ।। ६७ ।। पौषमाघांच्या मध्यवर्तीचा अर्ध एक । अमान्तमास-पक्षें पौष घेती लोक । पौर्णिमान्त चांद्रमास-पक्षें कित्येक । माघमास ऐसा अर्थ घेती ।। ६८ ।। तथापि सर्वथा सर्वनिर्णय-संमत । पौषकृष्ण अमावास्या दिवशीं निश्चित । रविवार श्रवण व्यतीपात् योगही प्राप्त । झालीं असतां 'अर्धोदयपर्व' जाणावें ।। ६९ ।। माघ शुक्ल चतुर्थीस । म्हणती 'ढुंढिराजव्रत' जन्मदिवस । प्रदोषव्यापिनी घ्यावी पूजनास । भाद्रपदशुक्ल चतुर्थीवत् निर्णय जाणावा ।। २७० ।। या चतुर्थीस कुंदपुष्पेंकरून । सायान्हीं सदाशिवाचें पूजन । उपवास किंवा नक्तभोजन । केल्यानें श्रेय प्राप्त होतें ।। ७१ ।। माघ शुक्ल पंचमी तिथी । ही आहे 'सरस्वतीजयंती' । 'वसंतोत्सवारंभ' वसंतपंचमी म्हणती । ती पूर्वाण्हव्यापिनी घ्यावी ।। ७२ ।। माघशुक्ल पंचमीस अभ्यंगस्नान । रतिमदनाचें करावें पूजन । वसंतोत्सवारंभ म्हणून । महोत्सव सर्वांनीं करावा ।। ७३ ।। दोन्ही दिवशीं दोन प्रहरीं असतां । पंचमी पूर्वींची घ्यावी तत्त्वतां । वसंतोत्सवारंभाकरितां । रतिमदनांचे पूजनासी ।। ७४ ।। माघशुक्ल रथसप्तमीदिनीं । 'सूर्यजयंती' म्हणती कोणी । ती घ्यावी अरुणोदयव्यापिनी । सूर्यग्रहणासारखी असे ।। ७५ ।। या रथसप्तमीस स्नान दान । केलें असतां प्राप्त होतें फल महान् । दोन्ही दिवशीं अरुणोदयकालीं व्यापून । असल्यास पूर्वींची करावी ।। ७६ ।। जेव्हां एक घटिका किंवा घटिकेहून । कांहीं षष्ठी अधिक असून । क्षय असल्यानें अरुणोदयापूर्वीं संपून । सप्तमी जात असेल ।। ७७ ।। तेव्हां सप्तमी घ्यावी षष्ठीयुक्त । आणि स्नान करावें अरुणोदय कालांत । पूर्वदिवशीं भोजन करून एकभुक्त । सप्तमीस अरुणोदयीं स्नान ।। ७८ ।। या जन्मींचें आणि जन्मांतरार्जित । पातक मन-वाणी-शरीरकृत । ज्ञात

आणि सातवें अज्ञात । ऐशीं 'सप्तविधपापें' जाणावीं ॥ ७९ ॥ ह्याप्रकारें सप्तविधपातकें । आणि सप्तव्याधिही देखे। रथसप्तमीच्या अरुणोदयीं एके । स्नानें नाशाप्रत पावती ॥ २८० ॥ पीठादिकीं रथस्थित सूर्यमूर्ति काढून। सूर्यनारायणाचें करावें पूजन । ह्या मन्वादि तिथींत पूर्वाण्ह- । व्यापिनी सप्तमीस श्राद्ध करावें ॥ ८१ ॥ माघशुक्ल 'भीष्माष्टमी' लक्षून । भीष्मोद्देशें जे करिती श्राद्धतर्पण । ते पुरुष होती संततीवान् । म्हणून श्राद्धार्थ मध्यान्हव्यापिनी घ्यावी ॥ ८२ ॥ माघशुद्ध द्वादशीस उपोषण । तिलस्नान करावें तिलें विष्णुपूजन । नैवेद्य तिलदान होम तिलभक्षण । तैलयुक्त दीपदान करावें ॥ ८३ ॥ माघी पौर्णिमा दुसरी घ्यावी । तद्दिनीं 'माघस्नानसमाप्ति' करावी । भोजन घालूनि द्विजदंपत्यांसि द्यावीं । वस्त्रभूषणें कंबल रक्त उपानहादि ॥ ८४ ॥ तिलश्राद्धतर्पण तिलपात्रदान । शालिग्रामदान वेणीदान । केलिया महत्फल होतें पुण्य । कुलधर्मही करावे ॥ ८५ ॥ माघकृष्णचतुर्दशी । 'वैद्यनाथजयंती' असे त्या दिवशीं । निशीथव्यापिनी शिवरात्रीसी । प्रगटले 'श्रीगिरिजाधव' ॥ ८६ ॥ माघकृष्णचतुर्दशी अर्धरात्रीयुक्त । असेल ते दिनीं करावें 'शिवरात्रीव्रत'। अश्वमेधफल होय प्राप्त । ऐसा नारदसंहितेंत निर्णय ॥ ८७ ॥ त्रयोदशीदिनीं चतुर्दशी निशीथव्यापिनी । असेल ते दिवशीं शिवरात्रीव्रत शुद्धमनीं । उपोषण जागरण पूजन करावें जनीं । ऐशीं अन्य स्मृतींत वाक्यें असतीं ॥ ८८ ॥ निशीथ म्हणजे दुसऱ्या प्रहरींची । माधवमतें एक घटिका शेवटची । आणि एक घटिका तृतीय-यामारंभाची । किंवा आठवा मुहूर्त रात्रीचा ॥ ८९ ॥ प्रथम दिवशीं निशीथव्यापिनी । चतुर्दशी असतां पहिलीच घ्यावी जनीं । दुसरे दिवशीं असतां अर्धरात्रव्यापिनी । किंवा दोन्ही दिवशीं मध्यरात्रीस नसतांही ॥ २९० ॥ दुसरे दिवशींची घ्यावी व्रता । दोन्ही दिनीं मध्यरात्रीस संपूर्ण व्याप्ति असतां । अथवा एकदेशव्याप्ति असतां तत्त्वतां । करावी पूर्वदिवसाचीच ॥ ९१ ॥ ऐसें हेमाद्रिकौस्तुभकाराचें मत । आणि दुसरे दिवशीं करावें शिवव्रत ।

****************************************

ऐसें माधव निर्णयसिंधु पुरुषार्थचिंतामणि आदि बहुत । ग्रंथकार म्हणती ऐक्यत्वें ।। ९२ ।। द्वितीयदिनीं व्याप्ति मध्यरात्रीच्या एकदेशास । आणि संपूर्णव्याप्ति पूर्वदिवसास । असतां मात्र पूर्वींची व्रतास । घ्यावी ऐसें प्रमाण ।। ९३ ।। पूर्वदिवशीं निशीथैक-भागव्याप्ति । आणि दुजे दिनीं संपूर्ण जरी ती । व्रतास दुसरी घ्यावी उक्ति । ऐशी शास्त्रीं बोलियेली ।। ९४ ।। या माघवद्यचतुर्दशीस रवि किंवा भौमवार । असल्या उत्तम प्रकार । त्यांत 'शिवयोग' असतां उत्तमोत्तम फार । अतिप्रशस्त पर्व जाणावें ।। ९५ ।। या शिवरात्रीस उपोषण जागरण । मुख्यत्वें आहे श्रीशिवपूजन । शंकरास लघु-महारुद्राभिषेकेंकरून । चारी प्रहरां अभिषेकावें ।। ९६ ।। या शिवरात्रीव्रताहून श्रेष्ठ व्रत नसे इतर । ते दिनीं जे न पूजिती रुद्र त्रिभुवनेश्वर । ते सहस्रावधिजन्म भोगिती दुर्धर । यातना निःसंशय जाणावें ।। ९७ ।। म्हणूनि नित्यकाम्य हें शिवरात्रीव्रत । प्रतिवर्षीं करावे उपवास शिवपूजा भक्तियुक्त । यदर्थीं शंकर पार्वतीस प्रबोधित । मद्भक्त व्रत आचरी जो हें ।। ९८ ।। त्यासी मी करितसें मद्रण अक्षय । आणि करितों अखंड आज्ञा दिव्य । तो सर्व महाभोग भोगुनी शुद्धप्रज्ञामय । मोक्षाधिकारी होतसे ।। ९९ ।। ब्राह्मणापासून तों चांडलापर्यंत । करण्यास अधिकार आहे शिवरात्रीव्रत । म्हणजे सर्वत्रांनीं श्रद्धाभक्तिसमन्वित । व्रतोपवासादि अवश्य करावें ।। ३०० ।। हें सुदुर्लभ महाशिवरात्रीव्रत । सकलपातकांचा नाश करित । चतुर्वर्णादिकीं भक्तियुक्त । या व्रतासी आचरावें ।। १ ।। हें व्रत इहलोकीं सुखदायक । आणि मुक्तिप्रदायक असे निश्चयात्मक । ऐसें महाव्रत प्रतिवर्षीं आवश्यक । शुभदायक करावें ।। २ ।। तीन प्रहरांच्या आंत चतुर्दशी समाप्त । होत असतां चतुर्दश्यन्तीं पारणा करिजेत । तीनयामांहून अधिक चतुर्दशी असत । तेव्हां चतुर्दशींत प्रातः पारणा करावी ।। ३ ।। या प्रकारें आहे माधवादिकांचें मत । ऐसेंच वर्णिलें निर्णयसिंधूंत । तीनप्रहरांपूर्वीं चतुर्दशी होईल समाप्त । तथापि चतुर्दशींत

पारणा करावी ॥ ४ ॥ करूं नये चतुर्दशीच्या अंतीं । यदर्थी शंकर पार्वतीस सांगती । चतुर्दशीस उपोषण करून शुद्धचित्तीं । चतुर्दशीमध्यें पारणा करावी ॥ ५ ॥ हा योग अगण्यपुण्येंहि दुर्लभतर । ऐशा या योगांत एकेक शिताचा फलविस्तार । सांगण्याविषयीं मी परमेश्वर । समर्थ नाहीं गे पार्वती ॥ ६ ॥ इत्यादि श्रेष्ठवचनेंकरून । चतुर्दशीमध्यें केलिया पारण । पुण्यातिशय आहे म्हणून । तिथीमध्यें पारणें करावें ॥ ७ ॥ माघकृष्णामावास्या-दिवशीं । अवतरले म्हणती 'वेदव्यासऋषि' । असतां शततारकानक्षत्र त्या दिवशीं । श्राद्धाचरणें पितरां परमतृप्ति ॥ ८ ॥ फाल्गुनशुद्धप्रतिपदेपासून । द्वादशदिनपर्यंत 'पयोव्रत' करणें जाण । श्रीभागवतीं केलें वर्णन । तदनुसार आचरावें ॥ ९ ॥ फाल्गुनशुद्धपंचमीतिथी । कोणी वदती 'याज्ञवल्क्यजयंती' । फाल्गुनशुद्धसप्तमीदिनीं म्हणती । 'कपिलावतार' जाहला ॥ ३१० ॥ फाल्गुनशुद्धद्वादशीला । कित्येक सांगती 'वीरभद्रावतार' झाला । कर्नाटकस्थ वदती अभिप्रायाला । वीरभद्रावतार वर्षाकालीं ॥ ११ ॥ फाल्गुनशुद्ध पौर्णिमेस । सायान्हीं 'हुताशनी'देवीचा जन्मदिवस । आणि 'वशिष्ठा'देवीचाही जन्म विद्वांस । वर्णिती वाराणशीचे ॥ १२ ॥ भद्रारहित प्रदोषव्यापिनी । पौर्णिमा घ्यावी हुताशनीपूजनीं । सूर्यास्तापासून सहाघटिका जनीं । प्रदोषकाल जाणावा ॥ १३ ॥ ढुंढाराक्षसी-पीडापरिहारार्थ । करावें होलिकापूजन विध्युक्त । तदा प्रार्थनामंत्र पठिजेत । अभिवंदन करावें ॥ १४ ॥ फाल्गुनकृष्ण प्रतिपदादिनीं । वसंतोत्सवारंभार्थ घ्यावी सूर्योदयव्यापिनी । सूर्योदयीं असतां दोन्ही दिनीं । तरी घ्यावी पहिलीच ॥ १५ ॥ या दिवशीं करावें तैलाभ्यंगस्नान । आणि करावीं आम्रपुष्पें भक्षण । सर्वारिष्टशांत्यर्थ वंदन । होलिकादेवीचें करावें ॥ १६ ॥ फाल्गुनकृष्णचतुर्थी तिथी । कोणी म्हणती 'गणेशोत्पत्ति' । श्रावणकृष्णचतुर्थीपासूनि करिती । संकष्टचतुर्थी गणेशव्रत ॥ १७ ॥ यावज्जीव किंवा एकवीस संवत्सर । एक वर्ष अथवा वर्षांत एकवार । संकष्टचतुर्थीव्रत करावें श्रेयस्कर । तदर्थ चंद्रोदयव्यापिनी चतुर्थी घ्यावी

॥ १८ ॥ प्रतिमासीं कृष्णपक्षीय चतुर्थीस । दिवसा करावा उपवास । चंद्रोदयकालीं रात्रीस । गणेशपूजन करावें ॥ १९ ॥ ही चतुर्थी चंद्रोदयव्यापिनी । घ्यावी गणेशभक्तजनीं । दोन्ही दिवशीं चंद्रोदयव्यापिनी । असतां घ्यावी दुसरीच ॥ ३२० ॥ कित्येक ग्रंथकारांचें मत । दोन्ही दिवशीं चंद्रोदयव्यापित । असल्यास तृतीयायोग प्रशस्त । सर्वोत्तम जाणावा ॥ २१ ॥ म्हणूनि तृतीयायुक्त चतुर्थी । घ्यावी असें कोणी म्हणती । दोन्ही दिवशीं चंद्रोदयीं चतुर्थी । नसेल तर दुसरी घ्यावी ॥ २२ ॥ जरी नसेल दोन्ही दिवशीं । चतुर्थी ती चंद्रोदयासी । तरी प्रदोषकालव्यापिनी व्रतासी । घ्यावी अवश्य दुसरीच ॥ २३ ॥ फाल्गुनकृष्ण 'रंगपंचमीदिन' । होलिकोत्सव होतसे संपूर्ण । फाल्गुनकृष्णाष्टमी दिन । 'बंदिदेवी'चा जन्म असे ॥ २४ ॥ फाल्गुनकृष्ण त्रयोदशीस । शततारकानक्षत्र असल्यास । 'वारुणीयोग' म्हणती त्यास । महत्पुण्यतम असे जो ॥ २५ ॥ त्यांतही शुभयोग शनिवार शततारका असल्यास । 'महावारुणीयोग' वदती त्यास । हा वारुणीयोगाहून श्रेष्ठ खास । शास्त्रकारीं वर्णिला ॥ २६ ॥ या दिवशीं गंगादि तीर्थीं स्नान । करावें यथाशक्त्या धन-धान्यवस्त्रादि दान । हा योग कोटि सूर्यग्रहणांसमान । पुण्यकारक सर्वांसी ॥ २७ ॥ फाल्गुन कृष्ण अमावास्यादिन । मन्वादितिथि आहे म्हणून । श्राद्धादिकांसी घ्यावी हो जन । अपराण्हव्यापिनी अमावास्या ॥ २८ ॥ (पौर्णिमा–निर्णय) प्रत्येक मासीची पौर्णिमा जाण । पहिली वटसावित्री व्रतावांचून । अन्य कृत्यांसी घेण्या योग्य न । दुसरी प्रतिपदायुक्त घेईजे ॥ २९ ॥ (शिवरात्री-निर्णय) प्रत्येक मासाची शिवरात्री तिथी । प्रदोषव्यापिनी घ्यावी उपोषणार्थ ती । कित्येक महाशिवरात्रीसारखी घेती । निशीथव्यापिनी कृष्णचतुर्दशी ॥ ३३० ॥ (प्रदोष-निर्णय) सूर्यास्तापासून सहाघटिका रात्रीपर्यंत । जो समय त्याला 'प्रदोषकाल' म्हणतात । शुक्ल कृष्ण पक्षीं त्रयोदशीस उपोषित । राहूनि सायं प्रदोषीं शिव पूजिजे ॥ ३१ ॥ या प्रदोष-शिवव्रतासी । प्रदोषव्यापिनी घ्यावी त्रयोदशी । दोन्ही दिवशीं प्रदोषकालासी । व्यापिनी

चतुर्दशी असेल ॥ ३२ ॥ अथवा सारखेपणें दोन्ही दिवशीं । प्रदोषकालाच्या एक भागासी । व्यापूनि असेल त्रयोदशी । तेव्हां द्वितीय स्वीकारावी ॥ ३३ ॥ पूर्व दिवशीं प्रदोषकालीं । त्रयोदशीची अधिक व्याप्ति असली । आणि दुसरे दिवशीं प्रदोषकालीं । स्वल्प व्याप्ति तरी दुसरी करावी ॥ ३४ ॥ परंतु प्रथमदिनीं प्रदोषकालांत । देवपूजा आणि भोजन होई तोंपर्यंत । त्रयोदशीची व्याप्ति अधिक असत । तरी पहिलीच घ्यावी व्रतासी ॥ ३५ ॥ देवपूजा भोजन होण्याइतुकी व्याप्ति । नसेल तर दुसरे दिवशीं करावी ती । दोन्ही दिवशीं प्रदोषकालीं व्याप्ति । नसल्यास दुसरी करावी ॥ ३६ ॥ (एकादशी-निर्णय) आतां संक्षेपें सांगूं एकादशी-निर्णय । ज्यांत अरुणोदय वेध आणि सूर्योदय । सूर्योदयापूर्वीं चार घटिका तो अरुणोदय । नंतर सूर्योदय स्पष्टचि ॥ ३७ ॥ अरुणोदयवेध वैष्णवांलागून । आणि सूर्योदयवेध असे स्मार्तांकारण । जरी छप्पन्न घटिकांहून । पळमात्र अधिक दशमी असेल ॥ ३८ ॥ तरी एकादशीस दशमी वेध अरुणोदयकालीं । समजा एकादशी दशमीनें विद्ध झाली । आणि दशमी साठघटिकांहून पळमात्र अधिक असली । तरी एकादशी दशमीवेध सूर्योदयीं ॥ ३९ ॥ म्हणजे अरुणोदयवेधित-कालीं । दशमीनें विद्ध एकादशी असली । तरी वैष्णवीं पाहिजे त्यागिली । दुसरी करणें अवश्य ॥ ३४० ॥ आणि सूर्योदयवेध म्हणजे सूर्योदयकालीं । दशमीनें विद्ध एकादशी असली । स्मार्तांनीं पाहिजे त्यागिली । पहिली करणें अवश्य ॥ ४१ ॥ जरी अरुणोदयवेध नसेल । आणि एकादशी वा द्वादशीची वृद्धि असेल । तरी पहिली वैष्णवीं त्यागूनि निर्मल । दुसरी घ्यावी उपोषणार्थ ॥ ४२ ॥ एकादशीची मात्र वृद्धि असतां । स्मार्तीं पहिली घ्यावी उपवास व्रता । आणि संन्यासीं इत्यादिकीं तत्त्वतां । करावी दुसरी अवश्य ॥ ४३ ॥ द्वादशीची असेल वृद्धि जर । आणि एकादशी शुद्ध असेल तर । त्या दिवशीं स्मार्तीं उपवास जागर । करावा अवश्य शुद्ध मनें ॥ ४४ ॥ असतां विद्ध एकादशी । स्मार्तीं करावी दुसरे दिवशीं । आणि एकादशी

द्वादशीची वृद्धि तरी आदरेंसीं । सर्वांनीं दुसरीच करावी ।। ४५ ।। परमापत्ति किंवा सौख्यकालांत । जननाशौच वा मृताशौचांत । त्यागीना एकादशी उत्तमव्रत । तोचि वैष्णव जाणावा ।। ४६ ।। सर्व जीवीं अद्वेषें ईश्वर पाहे । स्वकीयाचार-दक्ष दुष्कर्मी नोहे । जयें संपूर्ण कर्माचरण विष्णूसी समर्पिलें आहे । तोचि वैष्णव म्हणावा ।। ४७ ।। ऐशा सत्य चांगल्या वैष्णवावांचून । जे टिळेबिंदुमाळा वेषधारी इतर जन । ते जातीचे कोणीही असोत मानी विद्वान् । परंतु सत्य वैष्णव नसती ते ।। ४८ ।। विष्णुपुराणींचें असे वचन । जो कदा न चळे वेदोक्त स्ववर्णाश्रमधर्मापासून । शत्रुमित्रादिकांचे ठायीं पाहे आत्मबुद्धि समान । तोचि 'विष्णुभक्त' सत्य जाणिजे ।। ४९ ।। असो आतां कपिलाषष्ठी आणि गजच्छायानिर्णय । स्पष्टत्वें कथूं साभिप्राय । यच्छ्रवणें पातकराशी दूर होय । संशय मानसीं न धरावा ।। ३५० ।। (कपिलाषष्ठी-निर्णय) भाद्रपदकृष्णषष्ठी दिन । हस्तनक्षत्रीं सूर्य असून । मंगळवार नक्षत्र रोहिणी जाण । आणि व्यतीपात् सहावा ।। ५१ ।। ऐसे हे सहायोग एकत्र जेव्हां येती । 'कपिलाषष्ठी' तेव्हां म्हणती । हा योग दिवसांच घेती । रात्रीं घेणें अयोग्य ।। ५२ ।। या कपिलाषष्ठी-महापर्वणींत । यथाशक्ति हवन दानधर्म जो आचरित । तया कोटिगुण फल होत । ऐसें शास्त्रीं कथिलें असे ।। ५३ ।। (गजच्छाया-निर्णय) भाद्रपद कृष्णामावास्येसी । सूर्य चंद्र हस्तनक्षत्रासी । आले असतां संज्ञा तिजसी । 'गजच्छाया' ऐशी आहे ।। ५४ ।। या गजच्छाया पर्वणींत । श्राद्धदानादि कृत्यें आचरावीं शुद्धचित्त । सर्वांनीं विध्युक्त पितृपक्षांत । महालयश्राद्धें करावीं ।। ५५ ।। (महेश्वरावतार) महेश्वराचे अनेक अवतार । महादेव विष्णु इत्यादि नामें चतुःप्रकार । त्यांत स्वर्गींचे एकादशरुद्र । श्रोतीं आदरें परिसावे ।। ५६ ।। वीरभद्र शंभु गिरीश अजैकपात् । अहिर्बुध्न्य पिनाकी अपराजित् । भुवनाधीश्वर कपाली स्थाणु शोभत । आणि भव ऐसे एकादश ।। ५७ ।। अथवा अहिर्बुध्न्य अजैकपात । विरूपाक्ष सुरेश्वर जयंत । बहुरूप त्र्यंबक अपराजित । सवित्र हर भीम हे ऐसे ।। ५८ ।। (द्वादशादित्य)

आतां परिसा द्वादशादित्याभिधान । अर्यमा पुष्णा त्वष्टा सविता विवस्वान् । भग धाता विधाता मित्र वरुण । शुक्र उरुक्रम ऐसे हे ॥ ५९ ॥ हे द्वादशादित्य भगवान् । प्रसिद्ध कश्यपऋषीपासून । अदितीचे ठायीं उत्पन्न । झाले असती तेजस्वी ॥ ३६० ॥ (अष्टवसु) आतां अष्टवसूंचीं नामें परिसा निर्मल । आप् किंवा विष्णु अनिल । धर ध्रुव सोम अनल । प्रत्यूष आणि विभावसु ॥ ६१ ॥ हे 'अष्टवसु' संज्ञक स्वर्गलोकांत । प्रतिमन्वंतरीं देव भिन्न होतात । ते अथवा श्रीमद्भागवतांत । वर्णिले अष्ट वसु जे ॥ ६२ ॥ द्रोण प्राण ध्रुव दोप वसु । अग्नि अर्क आणि विभावसु । याप्रकारेंहि अष्टवसु । श्रीमद्भागवतीं वर्णिले ॥ ६३ ॥ (जगदंबावतार) श्रीजगदंबेचे अवतार अगणित । नवदुर्गांचीं नामें सांगूं त्यांत । स्मरणें पातकें भस्म होत । नाममालिका ती परिसा ॥ ६४ ॥ शैलपुत्री ब्रह्मचारिणी । चंद्रघंटा कूष्मांडा स्कंदमाता कात्यायनी । कालरात्री महारात्री आणि । सिद्धिदा ऐशा 'नवदुर्गा' ॥ ६५ ॥ चामुंडा वाराही ऐंद्री । माहेश्वरी लक्ष्मी कौमारी । ब्राह्मी देवी ईश्वरी । ऐशा ह्या 'जगन्माता' ॥ ६६ ॥ श्रीबाला बगला इत्यादिक । दशमहा विद्या रूपा जगदंबा सम्यक । नवनाग स्वग्रह नवनाथादि अनेक । असंख्यावतार ईश्वराचे ॥ ६७ ॥ (सप्तर्षि) कश्यप अत्रि भारद्वाज । विश्वामित्र गौतम जमदग्नि वशिष्ठऋषिराज । ऐसे सप्तर्षि सतेज । या मन्वंतरींचे असती ॥ ६८ ॥ (सप्त तारे) मरीचि अत्रि अंगिरस श्रेष्ठ । पुलस्त्य पुलह ऋतू वशिष्ठ । ऐसे 'सप्त तारे' आकाशांत । स्वतेजें नित्य झळकती ॥ ६९ ॥ असो विस्तार झाला बहुत । अतएव हा कथाभाग येथें समाप्त । पुढिले अध्यायीं निरूपण रसभरित । श्रोतीं सावधान परिसावें ॥ ३७० ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । श्रुतिस्मृतिपुराणार्थमथित । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । पंचमाध्याय गोड हा ॥ ३७१ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे पंचमोऽध्यायः समाप्तः ॥ ५ ॥

श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥